शनिवार दि. २५ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३२४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### लाळखुरकूत रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिमेला १३ ऑगस्टपासून होणार सुरुवात

## आयव्हीबीपी संस्थेकडून १ कोटी लसींचे वितरण

**जालना - प्रतिनिधी**

लाळखुरकूत या घातक विषाणूजन्य रोगापासून राज्यातील पशूधनाचे रक्षण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे लाळखुरकूत (एफएमडी) लसीकरण मोहीम फेरी-९ चे आयोजन करण्यात आले आहे. ही लसीकरण मोहीम येत्या १३ ऑगस्ट २०२६ पासून राज्यभरात सुरु करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या मोहिमेसाठी १ कोटी लसमात्रा केंद्र शासनाकडून राज्यस्तरावर प्राप्त झाल्या आहेत.

लाळखुरकूत रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम राज्यभरात वेळेत व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रत्यक्ष लसीकरण सुरु होण्यापूर्वी सर्व जिल्ह्यांपर्यंत लस साठा पोहोचणे आवश्यक आहे. उपलब्ध झालेला १ कोटी लसींचा पुरवठा राज्यातील सर्व जिल्ह्यांना शीत साखळीची खबरदारी घेऊन वितरित (वाटप) करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. या मोहिमेमुळे राज्यातील कोट्यवधी पशूधनाला लाळखुरकूत रोगापासून संरक्षण मिळणार असून, पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. परिणामकारक लसीकरण होण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत पशुधनाचे जंतनिर्मुलन करण्यात येत असून, आवश्यक औषधींचा पुरवठा सर्व संस्थांना करण्यात आला आहे. महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या सर्व खाजगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत पशुधनाला एफएमडी लसीकरण करून त्याची नोंद वर घेतल्यास प्रती पशुधन रु. ५/- प्रमाणे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे.

राज्यातील पशुधन रोगांपासून सुरक्षित ठेवणे व पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळणे यासाठी लाळखुरकूत (एफएमडी) लसीकरण मोहीम फेरी-९ अत्यंत महत्त्वाची आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये १३ ऑगस्टपासून ही मोहीम व्यापक स्वरुपात राबवली जाईल. सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे १००% लसीकरण करून घेऊन या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा. असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

पशुवैद्यकीय सेवांसाठी कॉल करा १९६२, व्हॉट्स अप चॅटबॉट सेवेसाठी ९०६३१४२२९९

### परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकारांविरोधात जालन्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन

## NTA बरखास्त करा, पेपरफुटीची उच्चस्तरीय चौकशी करा

### राष्ट्रपतींना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन, पोलीस भरतीसाठी वयोमर्यादा वाढविण्याचीही मागणी

**जालना । प्रतिनिधी**

देशभरात विविध स्पर्धा परीक्षा आणि प्रवेश परीक्षांमध्ये सातत्याने समोर येत असलेल्या कथित पेपरफुटीच्या घटना, परीक्षा प्रक्रियेतील अनियमितता तसेच विद्यार्थी आंदोलनांवरील कथित लाठीमाराच्या निषेधार्थ विद्यार्थी-युवक संघर्ष समितीच्या वतीने शुक्रवारी जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात विविध विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी, युवक आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी केंद्र सरकार आणि संबंधित यंत्रणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्याची मागणी केली. ''विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ थांबवा'', ''पेपरफुटी रोखा'', ''पारदर्शक परीक्षा व्यवस्था लागू करा'' अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून गेला.

**राष्ट्रपतींना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन**

आंदोलनानंतर आंदोलकांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत भारताच्या राष्ट्रपतींना सविस्तर निवेदन सादर केले. या निवेदनात परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि व्यावसायिक भविष्य धोक्यात आले असून, यामुळे परीक्षा व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळीत झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. (पान ४ वर)

## रेव्ह पार्टी की रोज पार्टी? मागासवर्गीय महिला महापौरांना बदनाम करण्याचा कट

### मनसेचे शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे यांचा गंभीर आरोप

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत महिला व बालकल्याण समितीच्या सभापती संध्या संजय देठे यांनी महानगरपालिकेच्या परिसरात ''रेव्ह पार्टी'' होत असल्याचा दावा केल्यानंतर शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकरणावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे यांनी तीव्र प्रतिक्रिया देत, हा संपूर्ण प्रकार मागासवर्गीय महिला महापौर वंदना मगरे यांची प्रतिमा मलिन करण्यासाठी रचलेला कट असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

रत्नपारखे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसारख्या जबाबदार व्यासपीठावर ''रेव्ह पार्टी''सारखा गंभीर आरोप करण्यात आला. मात्र त्यानंतर संबंधित सभापतींकडून ''रेव्ह'' नव्हे तर ''रोज पार्टी'' असा खुलासा करण्यात आला. या परस्परविरोधी भूमिकेमुळे नेमका सत्य प्रकार कोणता, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, जर महानगरपालिकेत खरोखरच कोणत्याही प्रकारच्या बेकायदेशीर किंवा अनैतिक गोष्टी सुरू असतील, तर त्याचे



ठोस पुरावे सभागृहात सादर का करण्यात आले नाहीत? केवळ आरोप करून नंतर भूमिका बदलणे हे अत्यंत बेजबाबदारपणाचे असून त्यामुळे संपूर्ण महानगरपालिका प्रशासन, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची प्रतिमा मलीन होत असल्याचे त्यांनी म्हटले. रत्नपारखे म्हणाले की, कोणत्याही अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यावर पुराव्याशिवाय आरोप करणे योग्य नाही. जर संबंधितांकडे माहिती किंवा पुरावे असतील, तर त्यांनी ती चौकशी यंत्रणेकडे देऊन दोषींवर कठोर कारवाईची मागणी करावी. मात्र कोणतेही ठोस पुरावे नसताना सभागृहात गंभीर स्वरूपाचे आरोप करणे म्हणजे जनतेची दिशाभूल करण्यासारखे आहे. महापौर वंदना मगरे या मागासवर्गीय समाजातील महिला असून त्यांना जाणीवपूर्वक लक्ष्य केले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. (पान ४ वर)

## मोटारसायकल चोर जेरबंद, सहा दुचाकी व टाटा ऐससह ₹६.२० लाखांचा मुद्देमाल जप्त

### गोंदी पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**अंबड/गोंदी । प्रतिनिधी**

गोंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाहनचोरीच्या गुन्ह्याचा छडा लावत गोंदी पोलिसांनी एका सराईत वाहनचोराला अटक केली आहे. आरोपीकडून चोरीची एक मोटारसायकल, आणखी पाच विनाक्रमांकाच्या दुचाकी आणि एक टाटा ऐस मालवाहू चारचाकी वाहन असा एकूण ₹६ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे



परिसरातील इतर वाहनचोरीच्या गुन्ह्यांचाही उलगडा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी जिल्ह्यातील वाहनचोरीच्या घटनांवर प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना दिल्यानंतर गोंदी पोलीस ठाण्याने संशयितांवर लक्ष ठेवून शोधमोहीम सुरू केली होती. पेट्रोलिंगदरम्यान मिळाली गुप्त माहिती २२ जुलै २०२६ रोजी सहायक पोलीस निरीक्षक अमोल गुरले हे पोलीस कॉन्स्टेबल शाकिरोद्दीन सिद्दीकी, दीपक भोजणे, गजानन भावरे, प्रदीप हवाळे आणि सलमान सय्यद यांच्यासह गोंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत नियमित पेट्रोलिंग करीत होते.

यावेळी गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, गोंदी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या वाहनचोरीच्या गुन्ह्यातील मोटारसायकल शहापूर परिसरातील एका व्यक्तीच्या ताब्यात आहे. या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तत्काळ कारवाई केली. चौकशीत आरोपीने दिली गुन्ह्याची कबुली पोलिसांनी ऋतिक बाळू गव्हाणे (रा. दाहेगाव, ता. अंबड, जि. जालना) याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गोंदी येथील गुन्ह्यातील चोरीची मोटारसायकल स्वतःकडे असल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याने संबंधित मोटारसायकल पोलिसांच्या ताब्यात दिली. यापुढे अधिक चौकशी केली असता आरोपीकडून आणखी पाच विनाक्र मांकाच्या मोटारसायकली तसेच एक टाटा ऐस मालवाहू चारचाकी वाहन जप्त करण्यात आले. ₹६.२० लाखांचा मुद्देमाल हस्तगत पोलिसांनी आरोपीकडून खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त केला आहे. गोंदी येथील गुन्ह्यातील चोरीची मोटारसायकल ५ विनाक्र मांकाच्या मोटारसायकली टाटा ऐस मालवाहू चारचाकी वाहन एकूण जप्त मुद्देमाल : ₹६,२०,००० पोलीस कोठडी; आणखी गुन्ह्यांचा तपास सुरू अटक करण्यात आलेल्या आरोपीला न्यायालयात (पान ४ वर)

## शालेय बस-व्हॅनसाठी नवे नियम लागू; सुरक्षा उपाय अनिवार्य

### २३ ते ३० जुलैदरम्यान विशेष तपासणी मोहीम; नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

राज्य शासनाने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला प्राधान्य देत शालेय बस, शालेय व्हॅन आणि शैक्षणिक संस्थांच्या वाहनांसाठीच्या नियमांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा केली आहे. महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बससाठीचे नियम) (पहिली सुधारणा) नियम, २०२६ अंतर्गत १६ जुलै रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या नव्या नियमांनुसार शालेय वाहतुकीचे भाडे प्रथमच अधिकृत नियमावलीच्या कक्षेत आणण्यात आले असून ते निश्चित करण्याचे अधिकार प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांना (आरटीए) देण्यात आले आहेत.

नवीन नियमांनुसार प्रत्येक शालेय बस व व्हॅनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस ट्रॅकिंग प्रणाली, सीट बेल्ट, डिजिटल हजेरी प्रणाली, पॅनिक बटण, व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाइस तसेच अन्य आवश्यक सुरक्षा सुविधा असणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवासावर अधिक प्रभावी देखरेख ठेवणे शक्य होणार असून शालेय वाहतूक अधिक सुरक्षित आणि पारदर्शक होणार आहे. पालकांना आता मोबाईल ॲपच्या माध्यमातून आपल्या पाल्याच्या प्रवासावर थेट लक्ष ठेवता येणार आहे. वाहनांमधील सीसीटीव्ही फुटेज किमान ३० दिवस सुरक्षित ठेवणे तसेच आवश्यकतेनुसार परिवहन, शिक्षण किंवा पोलिस विभागाला उपलब्ध करून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी चालक व मदतनिसांची पोलिस पडताळणी आणि शारीरिक सक्षमता तपासणी अनिवार्य करण्यात आली आहे. तसेच इयत्ता पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये महिला मदतनीस नियुक्त (पान ४ वर)

## एल निनोचा धोका: गणेश मूर्तींची उंची मर्यादित ठेवा, ॲड. महेश धन्नावत यांचे आवाहन

**जालना -प्रतिनिधी**

एल निनोच्या पार्श्वभूमीवर संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता, पाणी वाचवण्यासाठी गणेश मूर्तींची उंची मर्यादित ठेवण्याचे आवाहन ॲड. महेश धन्नावत यांनी केले आहे. पाणी वाचवण्यासाठी हा निर्णय अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.ॲड. महेश धन्नावत यांनी म्हटले आहे की, ''एल निनोच्या प्रभावामुळे यंदा पाणीटंचाईची गंभीर शक्यता वर्तवण्यात येत आहे. अशा परिस्थितीत, गणेशोत्सवादरम्यान पाण्याच्या वापराबाबत आपण सर्वांनी अधिक जागरूक राहणे गरजेचे आहे. गणेश मूर्तींची उंची मर्यादित ठेवल्यास मूर्ती विसर्जनासाठी लागणाऱ्या पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होईल आणि पर्यावरणाचेही रक्षण होईल. त्यामुळे, सर्व गणेश मंडळांनी आणि नागरिकांनी या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद द्यावा.'' या संदर्भात, महानगरपालिका , जालना फर्स्ट, कुंडलिका सेना फाउंडेशन, रोटरी आणि लायन्स यांसारख्या स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन जालना महानगरपालिकाला सर्व गणेश मंडळांची तातडीने बैठक बोलावण्याची विनंती करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या बैठकीत गणेश मूर्तींच्या उंचीबाबत एकमताने ठराव मंजूर करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.विशेष म्हणजे, जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे या पर्यावरण मंत्री देखील आहेत. त्यामुळे, जालना प्रशासनाने या पर्यावरणपूरक उपक्रमात पुढाकार घेऊन राज्यासमोर एक आदर्श घालून द्यावा आणि पाणी बचतीसाठी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## आनंदी स्वामी यात्रा उत्सवानिमित्त पालखी मार्ग प्रकाशमय

### विद्युत सभापती भाग्यश्री जोगस यांच्या पुढाकाराने जुना जालना परिसर उजळला

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहराचे आराध्य दैवत मानल्या जाणाऱ्या श्री आनंदी स्वामी महाराजांच्या आषाढी एकादशी यात्रा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांना सुरक्षित आणि सुलभ दर्शनाचा अनुभव मिळावा, तसेच पालखी मार्गावर कोणत्याही प्रकारची अंधाराची समस्या निर्माण होऊ नये, यासाठी जालना महानगरपालिकेच्या शिक्षण व विद्युत सभापती सौ. भाग्यश्री सुजितकुमार जोगस यांच्या पुढाकाराने पालखी मार्गावरील बंद पडलेले दिवे, फोकस आणि



हायमास्ट दिव्यांची दुरुस्ती करून आवश्यक ठिकाणी नवीन दिवे बसविण्यात आले आहेत. यामुळे जुना जालना परिसरातील प्रमुख मार्ग संपूर्णपणे प्रकाशमय झाल्याने भाविक आणि नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. यात्रेपूर्वी विद्युत व्यवस्थेला प्राधान्य श्री आनंदी स्वामी महाराजांच्या मंदिरात दरवर्षी आषाढी एकादशीच्या दिवशी मोठ्या उत्साहात यात्रा महोत्सव साजरा केला जातो. या काळात हजारो भाविक दर्शनासाठी आणि पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी शहरात येतात. त्यामुळे रात्रीच्या वेळेस भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतुकीच्या सुरळीततेसाठी पुरेशा प्रकाशव्यवस्थेची गरज लक्षात घेऊन मनपाने विशेष मोहीम राबविली. या मोहिमेत अनेक दिवसांपासून बंद असलेले पथदिवे सुरू करण्यात आले, खराब फोकस दिवे बदलण्यात आले तसेच आवश्यक ठिकाणी नवीन हायमास्ट दिवे बसविण्यात आले. या मार्गांवर करण्यात आली विशेष व्यवस्था यात्रेच्या पार्श्वभूमीवर खालील प्रमुख मार्गांवरील विद्युत व्यवस्था सुधारण्यात आली. आनंदी स्वामी गल्ली गणपती गल्ली बरवार गल्ली बाजार गल्ली कचेरी रोड गांधी चमन परिसर कालभैरव मंदिर परिसर पालखी मार्गावरील इतर प्रमुख रस्ते या सर्व मार्गांवर प्रकाशव्यवस्था सुरळीत करण्यात आल्याने रात्रीच्या वेळी भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे. नागरिकांकडून समाधान; कामाचे कौतुक बऱ्याच दिवसांपासून बंद असलेले (पान ४ वर)

# स्व.अजीत दादा यांच्या जयंतीनिमित्त अरविंद चव्हाण यांच्या हस्ते रूग्णांना फळ वाटप

## सोनाई रामजी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व पक्षाच्या वतीने सामाजिक उपक्रम

**जालना । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम राबवून सेवा सप्ताह साजरा करण्यात आला , सोनाई रामजी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, तांदूळवाडी , ता.जालना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आज शुक्रवार रोजी जिल्हा महिला व बाल रुग्णालय गांधी चमन येथे रूग्णांना फळ वाटप करण्यात आले . कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले .

जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा माजी आ. अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते जिल्हा रूग्णालयातील रूग्णांना फळ वाटप करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा संस्थेचे प्रमुख व कार्यक्रमाचें संयोजक आण्णासाहेब चितेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले




, यावेळी जालना शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शेख. महेमूद , प्रदेश सरचिटणीस धैर्यशील चव्हाण , शहर जिल्हा कार्याध्यक्ष मिर्झा अन्वर बेग ,प्रा. सोपानराव तेलगड , वंदना खांडेभराड , प्रभाकर घेवंदे , जालना ब्लॉक शहर अध्यक्ष शिवराज जाधव , पद्माकर हांडे , तालुका अध्यक्ष संतोष ढेंगळे , गणेश कावळे, सतीश वाहुळे,भानदास लहाने, परमेश्वर कापसे, गोरख कापसे, स. मोईन , संतोष घडे , अजीम बागवान , संतोष निकाळजे , शेख. अहेमद , सरला साठे ,अशोक गायकवाड आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सामाजिक न्याय सेलचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे यांनी केले.

# ब्रह्मास्त्र सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षपदी अमित कुलकर्णी, उपाध्यपदी सुमित कुलकर्णी तर सचिवपदी संकेत मोहिदे







**जालना । प्रतिनिधी**

सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या ब्रह्मास्त्र बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या नवीन कार्यकारिणीची नुकतीच घोषणा करण्यात आली. संस्थेच्या नुकत्याच पार पडलेल्या एका महत्त्वाच्या बैठकीत ही निवड जाहीर करण्यात आली असून, यामध्ये संस्थेच्या अध्यक्षपदी अमित चंद्रकांत कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे. तसेच उपाध्यक्षपदी सुमित कुलकर्णी तर सचिवपदी संकेत मोहिदे यांची सर्वानुमते निवड झाली आहे.

संस्थेच्या या बैठकीत नूतन पदाधिकाऱ्यांनी आगामी कालावधीत राबविण्यात येणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांची दिशा स्पष्ट केली. समाजोपयोगी विविध कार्यक्रम हाती घेऊन तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्याचा दृढ संकल्प यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देणे, तसेच पर्यावरण आणि आरोग्याशी संबंधित विविध उपक्रम राबवून समाजाच्या विकासात योगदान देण्याचा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अमित कुलकर्णी, सुमित कुलकर्णी आणि संकेत मोहिदे यांचे स्वागत केले आहे. दरम्यान, संस्थेची उर्वरित कार्यकारिणी लवकरच जाहीर करण्यात येणार असून त्यानंतर अधिक व्यापक स्वरूपात समाजकार्याला सुरुवात केली जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# विशेष सघन मतदार यादी पुनरावलोकन आणि विद्यार्थ्यांचा आवाज अभियानाला शहर काँग्रेसची धार

## महाराष्ट्र राज्य सहप्रभारी रेहाना रियाज चिश्ती यांच्या उपस्थितीत आढावा बैठक; युवक-विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा

**जालना - प्रतिनिधी**

शहर काँग्रेसच्या वतीने विशेष सघन मतदार यादी पुनरावलोकन आणि विद्यार्थ्यांचा आवाज या अभियानांच्या अनुषंगाने आढावा बैठक उत्साहात पार पडली. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या महाराष्ट्र राज्य सहप्रभारी रेहाना रियाज चिश्ती यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत अभियानाची सद्यस्थिती, विद्यार्थ्यांशी संवाद, संघटनात्मक बांधणी तसेच आगामी कार्यक्रमांच्या नियोजनावर सखोल चर्चा करण्यात आली. बैठकीत विशेष सघन मतदार यादी पुनरावलोकन मोहिमेचा आढावा घेण्यात आला. मतदार नोंदणी प्रक्रियेत नागरिकांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी कार्यकर्त्यांनी अधिक सक्रियपणे काम करावे, तसेच युवक व विद्यार्थ्यांपर्यंत पक्षाची भूमिका प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

प्रमुख मार्गदर्शन करताना रेहाना रियाज चिश्ती यांनी युवक आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी काँग्रेस पक्ष कायम कटिबद्ध असल्याचे सांगितले. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पक्षाची विचारधारा पोहोचविण्यासाठी संघटन अधिक सक्षम करण्याचे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी, रोजगार, स्पर्धा परीक्षा आणि सामाजिक प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. बैठकीत उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभियान अधिक प्रभावी करण्यासाठी विविध सूचना मांडल्या. तळागाळातील नागरिकांशी थेट संपर्क वाढवून मतदार जनजागृती आणि युवक सहभाग वाढविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या बैठकी च्या अध्यक्ष स्थानी जालना शहर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे हे होते. या वेळे ग्रामीण जिल्हा अध्यक्ष कल्याण दळे, मा.आ.राजेश राठोड,राजेंद्र राख,राजाभाऊ देशमूख डॉ. अस्मिता शहापूरकर एडवोकेट सय्यद अक्रम राजेश मुंडे ,बदर चाऊस,संजय ईंगळे,करीम बिल्डर, उबाळे पाटील, कृष्णा पडूळ, राजाभाऊ कुलकर्णी, चंद्रकांत रत्नपारखे, आदित्य चंदनकर, सागर चौधरी, शेख जमीर सर, प्रमोद अलाड, शेख शमशुद्दीन, रघुवीर गुडे, दायमाजी, ॲड. गव्हाणे, शेख वसीम, मोईज अन्सारी, ज्ञानेश्वर डुकरे, आरिफ खान, कलीम खान, सुरज यलगंटवार, शेख जमीर, देवराज डोंगरे, वसीम खान, दिनेश सूराना, जावेद कुरेशी, वैभव निर्मल, सलमान खान, नूर मोहम्मद, जफर मिर्झा, सय्यद रज्जाक, इमरान खान, राम भवर, भरत लोडा, दिग्विजय, अंकुश शिंदे, जावेद खान, सै. फैजान, शेख शब्बीर यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि युवक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत दोन्ही अभियाने अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# बेमुदत साखळी उपोषणाचा ३६ वा दिवस; शासन-प्रशासन मात्र उदासीन

## एससी आरक्षण उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी २८ जुलै रोजी जाफ्राबाद येथे महा जनआक्रोश मोर्चा

**दत्ता देशमुख**

अनुसूचित जाती (एससी) आरक्षणातील उपवर्गीकरण (अ, ब, क, ड) रद्द करण्यात यावे,या प्रमुख मागणीसाठी जाफ्राबाद तहसील कार्यालयासमोर सुरू असलेल्या बेमुदत साखळी उपोषणाने आज ३६ व्या दिवसात प्रवेश केला आहे. सलग ३६ दिवस संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी शांततामय व लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या या आंदोलनाची शासन व प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस दखल घेतलेली नसल्याने आंदोलनकर्त्यांमध्ये तीव्र संताप आणि नाराजी व्यक्त होत आहे.

उपवर्गीकरणाचा निर्णय अनुसूचित जातींच्या घटनात्मक आरक्षणाच्या मूळ तत्त्वालाच बाधा पोहोचवणारा असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे हा निर्णय तातडीने रद्द करावा, या एकमुखी मागणीसाठी समाजबांधव गेल्या ३६ दिवसांपासून अहोरात्र आंदोलनात सहभागी होत आहेत.

दररोज जाफ्राबाद तालुक्यातील विविध गावांमधून ३५ ते ५० महिला, पुरुष, युवक व ज्येष्ठ नागरिक उपोषणस्थळी




उपस्थित राहून आपल्या संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी सहभाग नोंदवत आहेत. आरदखेडा, बोरगाव, वरखेडा, देळेगव्हाण, खामखेडा, गाडेगव्हाण, हिवरा काबली, कुंभारझरी, देऊळझरी, काळेगाव, सोनखेडा, जवखेडा, डावरगाव, निमखेडा (कोरडे), मंगरूळ, तपोवन, हिवरा बळी, मठ बोरगाव/बोरी, कोल्हापूर, गोधनखेडा, निमखेडा बु., आंबेडकर नगर (जाफ्राबाद), चिंचखेडा, चापनेर, नळविहीरा, येवता, पिंपळगाव-वरूड, आसई, भोरखेडा, वरूड बु., म्हसरूळ, माहोरा, पासोडी, घाणखेडा, रमाई नगर (जाफ्राबाद), कोळेगाव, आंबेडकर, सिंधी बुटखेडा, सांजोळ आदी गावांतील समाजबांधव मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी होत असून आंदोलनाला दिवसेंदिवस व्यापक लोकसमर्थन मिळत आहे.

विशेष म्हणजे, हे आंदोलन पूर्णपणे शांततामय, शिस्तबद्ध आणि संविधानिक मार्गाने सुरू असूनही शासनाकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. शासनाच्या या उदासीन भूमिकेमुळे समाजात तीव्र असंतोष निर्माण झाला असून, न्यायासाठीचा संघर्ष अधिक व्यापक करण्याचा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, आंदोलनस्थळी विविध सामाजिक, धार्मिक व आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक सातत्याने भेट देऊन आंदोलनाला जाहीर पाठिंबा देत आहेत. संविधानाने बहाल केलेल्या आरक्षणाच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी समाज शेवटपर्यंत संघर्ष करेल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

याच पार्श्वभूमीवर मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जाफ्राबाद येथे एससी आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात भव्य ''महाजन आक्रोश मोर्चा'' काढण्यात येणार असल्याची घोषणा समन्वय समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या मोर्चामध्ये तालुक्यासह जिल्ह्यातील आणि राज्यातील हजारो समाजबांधव सहभागी होणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

आंदोलनकर्त्यांनी शासनाला स्पष्ट इशारा दिला असून, उपवर्गीकरणाचा निर्णय तातडीने मागे न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल.

## पान १ वरुन...

### NTA बरखास्त करा...

दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील कथित लाठीमाराचा निषेध निवेदनात दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या कथित लाठीमाराचाही तीव्र निषेध करण्यात आला. शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करणे हे संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या विरोधातील कृत्य असल्याचे आंदोलकांनी म्हटले आहे. या घटनेची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली.  बरखास्त करा, विद्यार्थ्यांची ठाम भूमिका विद्यार्थी-युवक संघर्ष समितीने राष्ट्रीय परीक्षा एजन्सी () च्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, परीक्षांमधील सातत्याने घडणाऱ्या गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांचा विश्वास उडाल्याचा आरोप केला. त्यामुळे  बरखास्त करून अधिक पारदर्शक आणि उत्तरदायी परीक्षा प्रणाली निर्माण करावी, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. या आहेत प्रमुख मागण्या

आंदोलकांनी निवेदनाद्वारे पुढील मागण्या केल्या आहेत.

राष्ट्रीय परीक्षा एजन्सी () बरखास्त करावी. तसेच इतर स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणांची उच्चस्तरीय चौकशी करावी. पेपरफुटीतील दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी.

परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह करावी.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा. राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनीही राजीनामा द्यावा.

दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनावरील कथित लाठीमाराची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.

२०२६ च्या महाराष्ट्र पोलीस भरतीसाठी वयोमर्यादा वाढवावी.

विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न

आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थी अनेक वर्षे कठोर परिश्रम घेत असतात. मात्र पेपरफुटी आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींमुळे त्यांचे परिश्रम वाया जात असून, लाखो विद्यार्थ्यांचे करिअर धोक्यात येत आहे. त्यामुळे सरकारने या प्रश्नाकडे केवळ प्रशासकीय विषय म्हणून न पाहता विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित गंभीर प्रश्न म्हणून पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

अनेक पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांसह निवेदन

राष्ट्रपतींना पाठविण्यात आलेल्या निवेदनावर अनिल मिसाळ, वैजिनाथ लोंढे, ॲड. राहुल बोबडे, समाधान खरात, समाधान खाडे, पवन दांडगे, मुजीब शेख, अंगद धनवे, पूनम लांडगे, बाबासाहेब पाटोळे, सचिन गाडगे आणि बाबासाहेब अंबडकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

आंदोलनाच्या शेवटी, विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर केंद्र व राज्य सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकारांना कायमचा आळा घालावा आणि विद्यार्थ्यांचा परीक्षा प्रणालीवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित करावा, अशी मागणी विद्यार्थी-युवक संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली.

### रेव्ह पार्टी की...

महानगरपालिकेतील प्रशासनावर टीका करण्याच्या नावाखाली महापौरांची प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न होत असल्याचे सांगत, अशा प्रकारच्या राजकारणाला मनसे कडाडून विरोध करेल, असे त्यांनी स्पष्ट केले. महिला व बालकल्याण समितीच्या सभापतींनी केलेल्या वक्तव्यामुळे संपूर्ण महानगरपालिकेची राज्यभर बदनामी झाली असल्याचे सांगत रत्नपारखे यांनी संबंधितांनी आपल्या आरोपांबाबत स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी केली. जर आरोप खरे असतील तर चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा निराधार आरोप करणाऱ्यांवरही योग्य ती कारवाई झाली पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. यापुढे महापौर वंदना मगरे यांना राजकीय हेतूने बदनाम करण्याचा किंवा विनाकारण लक्ष्य करण्याचा प्रयत्न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना शांत बसणार नाही, असा इशाराही राहुल रत्नपारखे यांनी दिला आहे.

दरम्यान, महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत झालेल्या या वक्तव्यांमुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले असून, या प्रकरणावर महापालिका प्रशासन, सत्ताधारी आणि विरोधकांची पुढील भूमिका काय असणार याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

### मोटारसायकल चोर...

हजर केले असता एक दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आरोपीने जप्त केलेली वाहने नेमकी कुठून चोरी केली, त्याचे इतर साथीदार आहेत का, तसेच आणखी वाहनचोरीच्या गुन्ह्यांमध्ये त्याचा सहभाग आहे का, याचा सखोल तपास गोंदी पोलीस करीत आहेत. तपासात आणखी चोरीची वाहने हस्तगत होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (अंबड) सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक अमोल गुरले, पोलीस कॉन्स्टेबल शाकिरोद्दीन सिद्दीकी, दीपक भोजणे, गजानन भावरे, प्रदीप हवाळे आणि सलमान सय्यद यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किरण हवाळे करीत आहेत. गोंदी पोलिसांच्या या कारवाईमुळे वाहनचोरी करणाऱ्या टोळ्यांवर मोठा आळा बसण्याची शक्यता असून, जिल्ह्यात वाहनचोरीविरोधात सुरू असलेल्या मोहिमेला आणखी बळ मिळाल्याचे मानले जात आहे.

### शालेय बस-व्हॅनसाठी...

करणेही सक्तीचे करण्यात आले आहे. याशिवाय बसमध्ये चढणाऱ्या व उतरणाऱ्या विद्यार्थ्यांची डिजिटल नोंद ठेवणे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि परिवहन व शालेय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांकडून संयुक्त तपासणी करणे आवश्यक राहणार आहे. जिल्हा शालेय बस सुरक्षा समित्यांना दर तीन महिन्यांनी अहवाल सादर करावा लागणार आहे. दरम्यान, शाळा व महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सुरू झाल्यानंतर शालेय वाहतुकीबाबत विविध तक्रारी प्राप्त झाल्याच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने दि. २३ जुलै ते ३० जुलै २०२६ या कालावधीत विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत शालेय बस, शालेय व्हॅन आणि शैक्षणिक संस्थांच्या वाहनांची सखोल तपासणी केली जाणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

परिवहन विभागाने शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक, प्राचार्य, शालेय बस समित्या तसेच वाहनधारकांनी नव्या नियमांचे काटेकोर पालन करावे, अशी सूचना केली आहे. तपासणीदरम्यान वाहनांची सर्व वैध कागदपत्रे सोबत ठेवावीत, अन्यथा नियमानुसार कारवाईला सामोरे जावे लागेल, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मनिष दौंड यांनी

### आनंदी स्वामी...

पथदिवे सुरू झाल्यामुळे परिसरात उजेड पसरला असून, नागरिकांनी या कामाचे स्वागत केले आहे. विशेषतः यात्रा काळात गर्दीच्या ठिकाणी प्रकाशव्यवस्था उपलब्ध झाल्यामुळे अपघात आणि गैरसोयी टाळण्यास मदत होणार असल्याचे नागरिकांनी सांगितले. विद्युत सभापती भाग्यश्री जोगस यांनी नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत वेळेत काम पूर्ण करून घेतल्याबद्दल स्थानिक रहिवासी आणि भाविकांनी त्यांचे कौतुक केले. मान्यवरांची उपस्थिती यावेळी प्रभाग क्रमांक १० च्या नगरसेविका कार्तिकाताई इंगळे, भाजप युवा मोर्चाचे प्रदेश सचिव प्रा. सुजित जोगस, मनोज इंगळे, श्री आनंदी स्वामी मठाचे ढोले महाराज तसेच परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते.

यात्रा महोत्सवाच्या काळात स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाशव्यवस्था आणि इतर नागरी सुविधा सुरळीत ठेवण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत असून, भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी प्रशासन सतर्क असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282.
अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.